# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः26.03.2025** **वारःबुधवार**

---

1. लोकसभेत वित्त विधेयक 2025 तर राज्यसभेत आपत्ती व्यवस्थापन सुधारणा विधेयक 2025 राज्यसभेत आवाजी मतदानानं मंजूर,
2. रस्ते सुरक्षितता शिक्षण शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट करण्याची महामार्गमंत्री नीतीन गडकरी यांची सूचना,
3. पायाभूत सुविधा, वीज, रस्ते, पाणी इत्यादी दहा क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करणारा, एक लाख कोटी रुपये खर्चाची तरतूद असलेला दिल्लीचा अर्थसंकल्प विधिमंडळात सादर, आणि
4. खेलो इंडिया पॅरा स्पर्धेत महाराष्ट्रातील खेळाडूंनी पटकावली 14 सुवर्णपदकांसह एकंदर 36 पदकं.

**संसद**

वित्त विधेयक 2025 करदात्यांचा सन्मान जपणारे असून, व्यवसाय सुलभतेसाठी करसवलती प्रदान करणारे असल्याचं प्रतिपादन अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी लोकसभेत केलं. वित्त विधेयक 2025 ला काल लोकसभेत मंजुरी देण्यात आली, त्यावेळी चर्चेला उत्तर देताना अर्थमंत्री बोलत होत्या. येत्या पावसाळी अधिवेशनात नवीन प्राप्तीकर विधेयक चर्चेला आणले जाईल अशी घोषणाही त्यांनी केली. नव्या करव्यवस्थेअंतर्गत 12 लाख रुपये उत्पन्न असलेल्या करदात्यांनाही शून्य कर भरावा लागणार असून करदात्यांना अभूतपूर्व करसवलत देणारे हे विधेयक असल्याचं सीतारामन यावेळी म्हणाल्या. वित्त विधेयकाबरोबरच लोकसभेत काल बॉयलर विधेयक 2024ला मंजुरी देण्यात आली. स्टीम बॉयलरच्या स्फोटांपासून जीवितहानी टाळण्याची तसेच मालमत्तेचे रक्षण करण्याची तरतूद या विधेयकामध्ये आहे. राज्यसभेत हे विधेयक आधीच मंजूर करण्यात आलं आहे. सर्व संबंधित भागधारकांशी चर्चा केल्यानंतर हे विधेयक संसदेत मांडण्यात आल्याचं वाणिज्य आणि उद्योगमंत्री पियुष गोयल यांनी सांगितलं. तत्पुर्वी, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेशी (मनरेगा) संबंधित निधी न दिल्याच्या आरोपावरून विरोधी पक्षांनी लोकसभेत निदर्शनं केली.

**राज्यसभा**

राष्ट्रीय आणि राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाला बळकटी देणारं आपत्ती व्यवस्थापन सुधारणा विधेयक 2024 राज्यसभेत काल आवाजी मंतदानानं मंजूर करण्यात आलं. लोकसभेनं हे विधेयक आधीच मंजूर केलं आहे. या विधेयकावरील चर्चेला उत्तर देताना केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आपत्ती व्यवस्थापन निधी वितरणात पारदर्शकता आहे, असं सांगून कोणत्याही राज्यांबाबत भेदभाव केल्याचे आरोप फेटाळून लावले. आपत्कालीन घटनांची व्याप्ती आणि प्रमाण बदललं असल्यानं त्यावरचा आपला प्रतिसाद बदलणं ही काळाची गरज असल्याचं शहा यांनी नमूद केलं. नव्या सुधारणाअंतर्गत दोन्ही प्राधिकरणांना राष्ट्रीय कार्यकारी समिती आणि राज्य कार्यकारी समितीऐवजी राष्ट्रीय आणि राज्य स्तरावर आपत्ती व्यवस्थापन योजना तयार करण्याचे अधिकार दिले गेले आहेत. यासोबतच राज्य सरकारांना राज्याची राजधानी आणि महानगरपालिका असलेल्या शहरांसाठी स्वतंत्र शहरी आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण स्थापन करण्याचा अधिकारही देण्यात आला आहे. काँग्रेसह विविध पक्षाच्या सदस्यांनी या विधेयकावरच्या चर्चेत सहभाग घेतला. या विधेयकात पीएम केअर्स फंडाचा तपशील किंवा त्याचा वापर कसा केला याचा उल्लेख नसल्याची टीका काँग्रेसचे नीरज डांगी यांनी केली. हे विधेयक अधिक छाननीसाठी संयुक्त संसदीय समितीकडे पाठवावं, अशी मागणी भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे संतोष कुमार पी यांनी केली.

**गडकरी-रस्ते अपघात**

देशातल्या रस्ते अपघातात 60 टक्क्यांहून अधिक मृत्यू 18 ते 45 वर्ष वयोगटातील लोकांमध्ये होत असल्याचं केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नीतिन गडकरी यांनी म्हटलं आहे. अपघातांमुळे देशाच्या सकल देशांतर्गत उत्पन्नाचं तीन टक्के नुकसान होत असल्याचंही गडकरी म्हणाले. दिल्लीत अमेरिकन चेंबर्स ऑफ कॉमर्स आयोजित 'रस्ता सुरक्षेसाठी तंत्रज्ञान हस्तक्षेपः अमेरिका-भारत भागीदारी' या चर्चेत ते बोलत होते. वाहतूक नियम आणि कायद्यांबद्दल विद्यार्थ्यांना जागरूक करण्यासाठी शाळांनी अभ्यासक्रमात रस्ते सुरक्षा शिक्षण समाविष्ट करावं, असं आवाहन गडकरी यांनी यावेळी केलं.

**अमित शहा**

केंद्र सरकारच्या सर्व समाज आणि समुदायांमध्ये एकात्मता साधणाऱ्या धोरणांमुळे जम्मू आणि काश्मीरममधून फुटीरतावादी चळवळींचा प्रभाव संपुष्टात आला असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी म्हटलं आहे. हुर्रियतशी संबंधित दोन संघटनांनी फुटीरतावादापासून फारकत घेत या गटांशी असलेले आपले सर्व संबंध तोडण्याचा निर्णय काल जाहीर केला. याबाबतची माहिती शहा यांनी समाजमाध्यमांवर आपल्या एका पोस्टद्वारे दिली आणि या निर्णयाचं स्वागतही केलं. त्यामध्ये शहा यांनी हे प्रतिपादन केलं आहे.

**माओवादी**

छत्तीसगडमधील दंतेवाडा आणि बिजापूर जिल्ह्यांच्या सीमावर्ती भागात काल सुरक्षा दलांसोबत झालेल्या चकमकीत तीन माओवादी ठार झाले. यांपैकी एक जण दंडकारण्य विशेष विभागीय समितीचा सदस्य म्हणून कार्यरत होता. सुरक्षा दलाला मिळालेल्या माहितीच्या आधारे ही कारवाई केल्याचं दंतेवाडाचे पोलीस अधीक्षक गौरव राय यांनी सांगितलं.

**संसद**

लोकसभेत आज वक्फ बोर्ड सुधारणा विधेयक सादर करण्यात येणार आहे. तर राज्यसभेत बँकिंग सुधारणा विधेयक मंजूर करून घेण्याचा सरकारचा प्रयत्न असेल.

**दिल्ली अर्थसंकल्प**

तब्बल एक लाख कोटी रुपये खर्चाची तरतूद असलेला दिल्लीसाठीचा अर्थसंकल्प काल मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी विधीमंडळात सादर केला. नव्याने स्थापन झालेल्या भाजपच्या नेतृत्वाखालील दिल्ली सरकारचा हा पहिलाच अर्थसंकल्प होता. मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांच्याकडे अर्थखात्याचा पदभारही असल्यामुळे, त्यांनी सभागृहात अर्थसंकल्प सादर केला. या वर्षीच्या दिल्ली अर्थसंकल्पात गेल्या वर्षाच्या तुलनेत 31 पूर्णांक 58 शताश टक्के वाढ झाली आहे. दिल्ली विधानसभेत 2025-26 या आर्थिक वर्षासाठी अर्थसंकल्प सादर केल्यानंतर माध्यमांना संबोधित करताना रेखा गुप्ता म्हणाल्या की, शिक्षण क्षेत्रासाठीच्या तरतुदीत 17 टक्के वाढ झाली असून त्यासाठी 19 हजार 291 कोटी रुपयांची तरतूद आहे. सरकारने वाहतूक क्षेत्रासाठीच्या तरतुदीत अर्थसंकल्पात 73 टक्क्यांनी वाढ केली असून गृहनिर्माण आणि शहरी विकासासाठीच्या तरतुदीत 9 टक्क्यांनी वाढ झाली असल्याचं रेखा गुप्ता यांनी अर्थसंकल्प सादर केल्यानंतर प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींना सांगितलं.

या अर्थसंकल्पात गेल्या वेळेपेक्षा दुप्पट अर्थात 28 हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त भांडवली खर्चाची तरतूद करण्यात आली आहे. राज्य सरकारची प्रमुख योजना असलेल्या महिला समृद्धी योजनेसाठीही अर्थसंकल्पात 5 हजार 100 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. वाहतूक क्षेत्रासाठी 12 हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त, तर पिण्याचे स्वच्छ पाणी आणि स्वच्छतेसाठी 9 हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. राष्ट्रीय राजधानीत 100 वेगवेगळ्या ठिकाणी अटल कॅन्टीन स्थापन करण्यासाठी सरकारनं अर्थसंकल्पात शंभर कोटी रुपये राखून ठेवले आहेत.

महिलांच्या सुरक्षेसाठी राजधानीत 50 हजार सीसीटीव्ही कॅमेरे बसवले जातील अशी घोषणाही गुप्ता यांनी केली असून ज्येष्ठ नागरिक आणि अपंगांसाठी तीन हजार 200 कोटी रुपयांची आर्थिक मदत दिली जाईल, असंही त्यांनी सांगितलं. मुख्यमंत्र्यांनी या अर्थसंकल्पाला ऐतिहासिक आणि आतापर्यंतचा सर्वात मोठा अर्थसंकल्प म्हटलं असून पायाभूत सुविधा, विकास, वीज, रस्ते आणि पाणी यासारख्या दहा क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करणारा हा अर्थसंकल्प दिल्लीला जागतिक पायाभूत सुविधेचं केंद्र बनवेल, असा विश्वास व्यक्त केला आहे.

**रिजीजू**

भारताला 2047 पर्यंत आत्मनिर्भर देश बनवण्याच्या प्रक्रियेत अल्पसंख्याक समुदायाचं योगदान महत्त्वाचं असणार आहे, असं केंद्रीय अल्पसंख्याक व्यवहार मंत्री किरेन रिजिजू यांनी म्हटलं आहे. ते काल नवी दिल्ली इथं झालेल्या राज्य अल्पसंख्याक आयोगांच्या परिषदेत बोलत होते.

**मन की बात**

पंतप्रधान नरेंद्र मोदी येत्या 30 तारखेला आकाशवाणीवरच्या 'मन की बात' या कार्यक्रमातून देशवासियांशी संवाद साधणार आहेत. या मालिकेचा हा 120वा भाग असेल.

**राज्यात ट्रम्प**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकन निवडणूक प्रक्रियेत मोठे बदल अनिवार्य करणाऱ्या आदेशावर स्वाक्षरी केली आहे. या बदलांनुसार मतदार-नोंदणीसाठी नागरिकत्वाचा कागदोपत्री पुरावा आवश्यक असून निवडणुकीच्या दिवसापर्यंत सर्व मतपत्रिका मिळण्याची खात्री करणं आवश्यक आहे.

**हुतात्मा**

महाराष्ट्राच्या अहिल्यानगर जिल्ह्यातील भारतीय लष्करात कार्यरत असलेले हवालदार रामदास बढे यांना काल जम्मू काश्मीरमधील तंगधर जिल्ह्यात कर्तव्य बजावत असताना वीरमरण प्राप्त झालं. त्यांच्या पार्थिव देहावर संगमनेर तालुक्यातल्या मेंढवण या त्यांच्या मूळ गावी आज दुपारी लष्करी इतमामात अंत्यसंस्कार केले जाणार आहेत.

**खेलो इंडिया**

नवी दिल्लीत सुरू असलेल्या खेलो इंडिया पॅरा स्पर्धेत राज्यातल्या खेळाडूंनी आतापर्यंत 14 सुवर्णपदकांसह एकंदर 36 पदकं पटकावली आहेत. यात मैदानी स्पर्धांमधल्या 10 सुवर्णपदकांचा समावेश आहे. भालाफेकमध्ये एफ 13 या प्रकारात प्रतीक पाटीलनं कास्यपदक तर कोल्हापूरच्या स्नेहल बेनाडे हिनं महिलांच्या गोळाफेकमध्ये रौप्यपदक जिंकलं. महिलांच्या एफ 56 प्रकारात मीना पिंगाने हिनं थाळीफेक करत तिसरं स्थान मिळवलं. राजश्री कासदेकर हिनं भालाफेकमध्ये कास्यपदक प्राप्त केलं.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.